| मा. व्यवस्थापन परिषद ठराव |
|---|
| २१ प्रव-अ-२५०/३००८२४<br>निर्भय कन्या अभियान योजनेबाबत.<br>**म : २६०/३००८२४**<br>असा ठराव करण्यात येतो की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता निर्भय कन्या अभियान या योजनेत सहभागी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी प्रत्यक्ष/ऑनलाईन व्याख्यानांचे आयोजन केल्यास रु.३,०००/- (प्रती व्यक्ती मानधन रु.१,०००/- याप्रमाणे जास्तीत जास्त ३ व्याख्याने असे एकूण रु.३,०००/- खर्चाचे विभाजन) आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणासह व्याख्यानाचे आयोजन तसेच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण अशा दोन्ही उपक्रमांचे आयोजन केल्यास रु.५,०००/- चे (प्रती तज्ज्ञ व्यक्ती मानधन रु.१,०००/- याप्रमाणे जास्तीत जास्त २ व्याख्यान, स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण रु.२,००० आणि आयोजन खर्च रु.१,०००/- असे एकूण रु.५,०००/- खर्चाचे विभाजन) पर्यंतचे अनुदान वितरित करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.<br>पुढे असाही ठराव करण्यात येतो की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्रस्ताव सादर केलेल्या ४५३ आणि पुढील कालावधीत अंदाजित प्राप्त होणारे ३० हून अधिक प्रस्ताव असे एकूण मिळून ४८३ महाविद्यालयास ही योजना राबविण्यास कमाल रु.५०००/- प्रमाणे अंदाजित रु.२४,१५,०००/- पर्यंतचा हा खर्च विद्यार्थी विकास मंडळाच्या 'सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा व इतर कार्यकारी योजना-महाविद्यालये व परिसंस्था' या अर्थशिर्षातून अदा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |